# A.V.E.SOCIETYS
# DEGLOOR COLLEGEDEGLOOR
# DEPARTMENT OF
# POLITICAL SCIENCE
# B.A. THIRD  YEAR




प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड ४३१७१७
इमेल : ratnakarlakshete1@gmail.com
Mobile No.: 9423439276

# बी.ए.तृतीय वर्ष
# राजकीय विचारप्रणाली

## MATERIALISTIC OR ECONOMIC INTERPRETATION OF HISTORY
## ऐतिहासिक भौतिकवाद /इतिहासाची भौतिक मीमांसा /आर्थिक व्याख्या

- प्रास्ताविक
- मार्क्सच्या या सिद्धांताला आर्थिक नियतीवाद /इतिहासाची आर्थिक व्याख्या या नावाने ही ओळखतात.
- दवंद्वात्मक भौतिकवादाच्या आधारावरच मार्क्सने इतिहासाची भौतिक दृष्टीकोनातून विवेचन व विश्लेषण केले आहे.
- इतिहास या शब्दाचा अर्थ अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने सांगितला आहे.
- इतिहासाचा जनक हिरोडोटस-इतिहासातील संस्मरणीय व मनोरंजक घडामोडीचा आढावा म्हणजे इतिहास होय.
- इतिहास मोठ मोठे राजे,बादशाह ,योद्धे,सेनापती यांचा अभ्यास होय.
- इतिहास म्हणजे व्यक्तीचे चरित्र चारित्र्य विचार आणि कृतीचा समाज व जन माणसावर पडलेल्या प्रभावाचे वर्णन होय.
- इतिहासाची निर्मिती जुलियस सीजर, नेपोलियन, क्रामवेल यासारखे महान व्यक्ती करतात –असे कार्लाइल म्हणतो
- इतिहास केवळ मानवी ज़ीवनात गतकाळात घडलेल्या घटना ,चळवळी,विचारप्रवाह ,संस्था,सत्ता ,युद्धे यांचा अभ्यास व नोंद होय

# इतिहासाची भौतिक मीमांसा /आर्थिक व्याख्या अर्थ

- इतिहासातील सर्व घटना आर्थिक अवस्थेमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा परिणाम आहे.
- इति'हासात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा अर्थ आर्थिक दृष्टीकोनातून लावतो.
- भविष्याच्या दृष्टीकोनातूनही इतिहासाचा अर्थ लावला पाहिजे
- अर्थ हा मानवी जीवनाच्या व्यवहार व विचाराचा केंद्र बिंदू आहे.
- आजपर्यंतच्या समाजाच्या विकासाचा आधार आर्थिक आहे.
- मानवी क्रिया आर्थिक तत्वाने प्रभावीत होतात.
- भौतिक-आर्थिक घटकच परिवर्तनाची प्रेरणा आहे.
- सर्व विचार,दृष्टीकोन जीवनाच्या भौतिक अवस्थेपासून जन्म/उत्पन्न  घेतात
- वस्तूचे उत्पादन व वितरण तंत्र हे तत्व मानवी संबंध नियंत्रित करतात.
- उत्पादन व वितरण तंत्रातील बदल हेच समाज परिवर्तनाचे अंतिम प्रेरक घटक आहेत.
- उत्पादांच्या साधनामध्ये जस जसा बदल होतो तास तसा बदल समाजाच्या जीवन पद्धतीत होतो.
- मनुष्य पूर्णतः आर्थिक शक्तीचा गुलाम आहे.
- उत्पादनाच्या साधनांना निसर्गातील परिवर्तनाचे प्रमुख कारण मानले.

- उत्पादन पद्धतीवर सामाजिक-राजकीय आणि बौद्धिक जीवनाची संपूर्ण क्रिया अवलंबून असते.
- वेपरच्या मते-मनुष्य अन्न वस्त्र निवारा या शिवाय जगू शकत नाही त्यासाठी त्यास श्रम करावे लागते.
- श्रम हा सामाजिक जीवनाचा आधार आहे.
- उत्पादन पद्धती समजाच्या विकासामध्ये निर्णायक भूमिका बजावते .
- उत्पादन पद्धतीबरोबरच समाजतल्या वर्गात व त्य्नाच्या संबंधात परिवर्तन होत असते.
- इतिहासाची प्रत्येक अवस्था म्हणजेच वर्ग संघर्षाचा इतिहास आहे.
- धर्म ही अफूची गोळी आहे.
- त्याच्या विचारात धर्माला कांहीच स्थान नाही.
- धर्म अफूच्या नशेसारखा आहे.

# इतिहासाची भौतिक मीमांसा /आर्थिक व्याख्या

- उत्पादन साधनाच्या आधारावर समाजच्या इतिहासामध्ये जो बदल झाला आहे.त्याचे वर्णन कार्ल मार्क्स ने खालील टप्यात केले आहे.
- प्राचीन साम्यवाद
- गुलामगिरीचे युग
- सरंजामशाहीचे युग
- भांडवलशाहीचे युग
- समाजवादाचे युग
- साम्यवादाचे युग

# प्राचीन साम्यवाद

- या अवस्थेला आदिम ,रानटी किंवा प्राथमिक अवस्था किंवा प्राचीन समूह वाद या नावानेही ओळखतात
- सामाजिक विकासाची ही पहली अवस्था होय.
- यात मनुष्य निसर्गावर अवलंबून होता.
- मनुष्याच्या गरजा खूप कमी होत्या
- निसर्गातील फळे खाऊन तो आपली उपजीविका भागवत असत
- सामुहिक पद्धतीने खात असत
- या काळात पूर्ण समता व स्वातंत्र्य होते.
- दगड,धोंडे, धनुष्य बाण, लाकूड, काटी हे उत्पादनाचे साधन होते.
- या सर्वावर समाजाची सामुहिक मालकी होती.
- खाजगी व व्यक्तिगत संपत्ती नव्हती
- विवाह प्रथा व कुटुंब नव्हते
- सर्व स्त्री पुरुष समान होते.
- कोणाचेही कोणाकडून शोषण होत नव्हते .
- समाजात कोणताही वर्गभेद नव्हता.वर्ग संघर्ष ही नव्हता
- सार्वजनिक अधिकार होते व्यक्तिगत नाही
- प्रत्येकजण श्रम करत होता

# गुलामगिरीचे युग

- प्राचीन साम्यवादी युगात बदल होवून गुलामगिरीच्या युगाची सुरुवात झाली.
- खाजगी संपत्तीचा उदय झाला.
- शेती व पशुपालन या व्यवसायाचा उदय झाला.
- कांही लोकांनानी जमिनींची मालकी घेवून दुसर्याच्या श्रमावर उत्पन्न काढले.
- श्रम करणारा श्रमिक हा शोषित बनला.
- श्रम करून घेणारा मालक हा शोषक बनला.
- मालक व गुलाम या दोन वर्गाची निर्मिती झाली.
- समता व स्वातंत्र्य नष्ट झाले.
- जमीनदार व गुलाम असे दोन वर्ग निर्माण झाले.
- या दोन वर्गात संघर्ष व अंतर्विरोध सुरु झाला.

# सरंजामशाहीचे युग

- यास सामंतवादी युग किंवा जमीनदार किंवा जहागीरदाराचा काळ म्हणतात.
- जो मध्य्युगाचा काळ होता.
- मालक व गुलाम यांच्या संघर्ष निर्माण झाल्याने राजाने जमिनीचे वाटप कांही व्यक्तीमध्ये केले.
- असे व्यक्तीच जमीनदार बनले.
- ते त्याबदल्यात राजाला संपत्ती व पैसा पुरवीत असत.
- जमीनदाराचा एक वर्ग व त्या जमिनीवर राबणारा दुसरा वर्ग निर्माण झाला ज्यास भुदास असे म्हणतात
- जमिनदार भूदासावर अन्याय अत्याचार करत असत.
- अधिक श्रम व कमी वेतन भूदासांना मिळत असत .
- भुदास गुलाम ही नव्हते व स्वतंत्र ही नव्हते.
- जमिनदारांनी  भूदासांचे शोषण केल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला.

# भांडवलशाहीचे युग

- १८ व्या शतकातील औदौगिक क्रांतीने उत्पादनाच्या साधनात अमुलाग्र परिवर्तन झाले.
- उत्प्दानाची जुनी साधने नष्ट होवून आधुनिक नव्या साधनांचा उदय झाला.
- उत्पादनाची सर्व साधने व्यापारी व भांडवलदार वर्गाच्या हातात गेली.
- उत्पादनाचे प्रमाण वाढले.
- परीनामता भांद्वाल्दाराचा एक वर्ग व कामगारांचा एक वर्ग निर्माण झाला.
- वस्तूच्या उत्पन्नाचे कार्य कामगार करीत असत.
- भांडवलदाराकडून कामगाराचे फार मोठ्या प्रमाणात शोषण होवू लागले.
- परिणामता कामगारामध्ये असंतोषांची भावना निर्माण झाली.
- कामगार व भांडवलदार यांच्यात संघर्ष होव् लागला.
- या संघर्षाने एक नव्या व्यवस्थेच्या निर्मितीस पाठबळ दिले.

# समाजवादाचे युग

- भांडवलदार व कामगार यांच्या संघर्षात कामगारांचा विजय होवून सर्व सत्ता कामगार वर्गाच्या हातात प्रस्थापित होईल .
- उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची होतील .
- खाजगी मालकी नष्ट होईल.
- संपत्तीचे समान वितरण होईल.
- कामगार भांडवलशाहीचे सर्व अवशेष नष्ट करतील.
- त्यानंतर समाजात वर्ग व वर्गसंघर्ष शिल्लक राहणार नाही.
- वर्ग विहीन समाजाची निर्मिती होईल.

# साम्यवादाचे युग

- मानवी विकासाची शेवटची अवस्था म्हणजे साम्यवादाची आहे.
- यात भांडवलदाराचे अस्तित्त्व असणार नाही.
- शोषक वर्ग असणार नाही.
- राज्यविहीन व वर्ग विहीन समाजाची निर्मिती होईल.
- उत्पादनाच्या सर्व साधनावर समाजची मालकी निर्माण होईल.
- अन्याय,अत्याचार,पिळवणूक,शोषण असणार नाही.
- श्रमिकांचा एकाच वर्ग असेल.
- वर्ग संघर्ष होणार नाही.
- प्रत्येकजण आपल्या पात्रतेनुसार काम करेल.
- ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणे व क्षमतेप्रमाणे समाजात वस्तूचे वाटप केले जाईल.

# सारांश


- उत्पादन किंवा आर्थिक व्यवस्थेच्या आधारावर समाजच्या इतिहासाचे सहा भागात विभाजन केले.
- इतिहासाचा अभ्यास मानवी समाजाचे नियम पाहण्यासाठी केला जातो.
- आर्थिक शक्ती हेच परिवर्तनाचे कारण आहे.
- कोणत्याही राष्ट्रात वस्तूचे उत्पादन ,विनिमय व वितरणाची भूमिका सर्वात प्रमुख असते.
- प्रत्येक युगातील सामाजिक व्यवस्थेवर उत्पादनाच्या साधनावर प्रभुत्व असणाऱ्या वर्गाचे आधिपत्य असते.
- वर्ग संघर्ष सामाजिक विकासाची कुंजी आहे.
- साम्यवादी व्यवस्थेच्या स्थापनेनंतर वर्ग विहीन व राज्य विहीन समाजाची स्थापना होईल.

# इतिहासाची भौतिक मीमांसा /आर्थिक व्याख्या दोष

- आर्थिक घटकावर अधिक भर देणे चुकीचे
- आर्थिक आधारावर सर्व ऐतिहासिक घटनेचा अर्थ लावणे अयोग्य
- धर्मास विरोध करने व त्यावर टीका करने चुकीचे
- राज्यविचीन समाज अश्यक्य
- भौतिक विकासाच्या इतिहासाचा कार्यक्रम चुकीचा
- वर्गा संबंधीचा विचार अयोग्य
- इतिहास निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्वाकडे दुर्लक्ष करने चुकीचे
- आकस्मिक घटकाकडे दुर्लक्ष करने चुकीचे

# कार्ल मार्क्स







लेनिन



स्टॅलिन